# वसई-विरार शहर महानगरपालिका
## अनधिकृत बांधकाम विभाग

दि.२८/०९/२०२२

**<u>प्रेसनोट</u>**

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' कार्यक्षेत्रातील ससुनवघर, हॉटेल कच्छ दरबार मागे, स.नं.१७८ या ठिकाणी ४२०० चौ.फुट क्षेत्रफळाचे पत्रा चॅनेलचे बांधकाम व ११०० चौ.फुट क्षेत्रफळाचे आर.सी.सी. बांधकाम अशा एकूण ५३०० चौ.फुट क्षेत्रफळाच्या अनधिकृत बांधकामावर दि.२८ सप्टेंबर २०२२ रोजी महानगरपालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'जी' येथे ससुनवघर, हॉटेल कच्छ दरबार मागे, स.नं.१७८ येथे अनधिकृत बांधकाम सुरु असल्याची माहिती मिळाल्यावर महानगरपालिका अतिक्रमण विभागाचे उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांनी सदर ठिकाणी भेट दिली. या संदर्भात मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार व मा.अतिरिक्त आयुक्त श्री.आशिष पाटील यांच्या निर्देशानुसार उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांनी प्रभाग समिती 'जी' च्या सहा.आयुक्त श्रीम.धनश्री शिंदे यांना सदर ठिकाणी तात्काळ तोडक कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सहा.आयुक्त श्रीम.धनश्री शिंदे यांनी कर्मचाऱ्यांच्या मदतीने व जेसीबीच्या सहाय्याने एकूण ५३०० चौ.फुट क्षेत्रफळाच्या पत्रा चॅनेल व आर.सी.सी.बांधकाम केलेल्या अनधिकृत बांधकामावर पूर्णतः निष्कासनाची कारवाई केली. कारवाईच्या वेळी अतिक्रमण विभाग उप-आयुक्त श्री.अजित मुठे, सहा.आयुक्त श्रीम.धनश्री शिंदे, क.अभियंता श्री.कल्पेश कडव, लिपिक श्री.विजय नडगे व अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

मा.आयुक्त महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात होत असलेल्या अनधिकृत बांधकामांवर नियमित कारवाई केली जात आहे.

**अनधिकृत बांधकाम विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**